**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवासमोर, पुणे १

श्री. सदाशिव आण्णाप्पा ऊर्फ
आप्पाण्णा इसापुरे
रा. मंगळवार पेठ, इसापूर गल्ली,
शिवमंदिरा जवळ, मिरज, जि. सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली, जि. सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४५ / सांगली |
| २ | सनावणीची तारीख | दि. २९.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. सदाशिव आण्णाप्पा ऊर्फ आप्पाण्णा इसापुरे
रा. मंगळवार पेठ, इसापूर गल्ली,
शिवमंदिरा जवळ, मिरज, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली, जि. सांगली श्री. वाय. बी. माळी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली, जि. सांगली श्री. एस. टी. रसाळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.१.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६.३.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती अपुरी मिळाली व काही मुद्दे प्रश्नार्थक असल्याच्या कारणावरुन माहिती नाकारण्यात आली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. सदाशिव आण्णाप्पा ऊर्फ आप्पाण्णा इसापुरे यांनी केली.

श्री. इसापुरे यांना वेळोवेळी विहित मुदतींत माहिती देण्यात आली आहे. माहिती मिळूनही माहिती दिली नसल्याची तक्रार ते सातत्याने करीत असतात. अनेक मुद्दयांमध्ये त्यांनी 'आहे किंवा कसे ?' अशा स्वरुपाची विचारणा केली असून खुलासा मागितला आहे. अशा मुद्दयांची ही उत्तरे अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांच्या आदेशानंतर त्यांना दिली आहेत, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका श्री. एस. टी. रसाळे यांनी केले. त्यांचे हे प्रतिपादन रास्त असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त श्री. वाय. बी. माळी यानी नमूद केले.

अपीलकर्त्यास सर्व मुद्दयांचे उत्तर देण्यात आले आहे, असे उभय बाजूंनी सादर केल्या कागदपत्रांवरुन दिसते. तथापि कोणतीही माहिती राहिली आहे, असे अपीलकर्त्यास वाटत असल्यास व नेमकेपणाने अपीलकर्त्याने तसे नमूद केल्यास त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा कर निर्धारक व संकलक, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांनी माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु त्यानुसार आपल्याला माहिती मिळाली नसल्याची तक्रार करणारा पत्रव्यवहार श्री.विसापुरे यांनी जन माहिती अधिकारी तथा कर निर्धारक व संकलक श्री. ए.आर.पाटील यांच्याशी करुन त्याच्या प्रती आयोगाला सादर केल्या. 'खोटा पत्रव्यवहार टाळावा, अन्यथा पायातील हातात घ्यावे लागेल,' असे श्री. इसापुरे यांनी

श्री. पाटील यांना पाठविलेल्या दि.३.१२.२००८ च्या पत्रात म्हटले आहे. अशा स्वरुपाची भाषा सभ्यतेची नसून आक्षेपार्ह आहे. अपीलकर्त्यास त्याबाबत समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २० .११.२००९

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

सुनील रामचंद्र सुतार
मु. पो. सरुड, ता. शाहुवाडी,
जि. कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** शाखा अधिकारी,
हुतात्मा सहकारी बँक लि., वाळवा, शाखा शिराळा,
मु. पो. व ता. शिराळा, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४५० / २००९ / कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.०६.२००९ |
| ३ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - १) श्री. सुनील रामचंद्र सुतार यांचा कर्ज खाते उतारा २) सेव्हिंग खात्यावरील पहिल्यापासून आज अखेरच्या व्यवहाराची माहिती ३) श्री. संपत बाळासो पाटील यांचा कर्ज खाते उतारा इ. | |

**विवेचन**

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्रमांक ५६६६ / २००७ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार नागरी सहकारी बँकांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. तसेच

अपीलकर्त्याने अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, जनमाहिती अधिकाऱ्यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
दि. २६-१० -२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

ॲड.बी.एस.वाघमारे
१०१, अमित कोर्ट, पहिला मजला, मंगला थिएटरमागे,
पुणे जिल्हा न्यायालयाजवळ, शिवाजीनगर, पुणे-५ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
फलटण उपविभाग, फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४५६ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.१०.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** ॲड.बी.एस.वाघमारे
१०१, अमित कोर्ट, पहिला मजला, मंगला थिएटरमागे,
पुणे जिल्हा न्यायालयाजवळ, शिवाजीनगर, पुणे-५

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा श्री.व्ही.एस.देशमाने

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
फलटण उपविभाग, फलटण, जि.सातारा श्रीमती रेश्मा माळी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.६.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.८.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>तहसीलदार फलटण यांचे दि.५.५.६.२००६ व प्रांत कार्यालयाचे क्र.मा.अ.एसआर/१४/०७ च्या पत्रातील मुद्दयांबाबत माहिती, क्रिमी लेयर प्रमाणपत्राची काय पडताळणी केली याचा लेखी तपशील. केंद्राचा माहिती चा अधिकार कलम ८(क) ची नक्कल. | |

## विवेचन

नॉन क्रिमी लेयर प्रमाणपत्रामधील पडताळणीबाबतची माहिती अपीलकर्ता ॲड.बी.एस.वाघमारे यांनी मागितली होती. अशा प्रमाणपत्राची वैधता एक वर्षापुरतीच असते. त्यामुळे त्यांना जोडण्यात आलेले कागदपत्र हे वैधता संपल्यानंतर नष्ट करण्यात येतात. अभिलेखांच्या वर्गवारीनुसार ही कागदपत्रे झेड वर्गवारीत येतात. त्यामुळे ती नाश करण्यात आली असून उपलब्ध नाहीत, असे ॲड.वाघमारे यांना त्या त्या वेळी कळविण्यात आले असून तहसीलदार, फलटण यांनी नोंदवहीतील तशा नोंदीची छायांकित प्रत सादर केली, असे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, फलटण श्रीमती रेश्मा माळी व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा श्री.वसंत देशमाने यांनी लेखी व तोंडी नमूद केले. हे लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ८.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.वसंत आप्पासाहेब चौगुले
स.नं.४९/२, प्लॉट नं.४४, चंदननगर(खराडी), नगररोड, पुणे-१४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शहर विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण,
बांधकाम विभाग कार्याल्य, पुणे महानगरपालिका, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४५७ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.वसंत आप्पासाहेब चौगुले
स.नं.४९/२, प्लॉट नं.४४, चंदननगर(खराडी), नगररोड, पुणे-१४

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त (ज),
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.भानुदास माने

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
(ज.ने.रो.श.पु.अ.), पुणे महानगरपालिका, पुणे श्री.एम.एल.कराळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.११.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** स.नं.४९/२, प्लॉट नं.४४, चंदननगर (खराडी), नगररोड या जागेवरील दि.२८.९.२००७ या जागेवरील नकाशा मंजूर न झालेले व विनापरवाना युध्दपातळीवर चालू असलेले बांधकामावरती कारवाई का करत नाही व त्याच जागेवर विनापरवाना दि.२८.९.२००७ नंतर झालेले बांधकामावर कारवाई न करण्याचे कारण. बांधकाम करण्यासाठी नकाशा मंजूर होण्यासाठी आवश्यक जागा, ८०० चौ.फू.नकाशा मंजूर होतो का? दि.७.९.२००७ ते दि.९.१०.२००७ पर्यंत वरील जागेचा नकाशा मंजूर झाला आहे काय व तत्संबंधीची माहिती. तसेच विनापरवाना बांधकामाबाबत असलेले नियम, कायदे, करण्यात येणारी कारवाईची माहिती. |
|---|---|

## विवेचन

बेकायदेशीर बांधकाम तोडण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांनी लोकशाही दिनात आदेश देऊनही त्यानुसार कारवाई झाली नाही. चंदननगर-खराडी-नगर रोड, पुणे येथे नकाशा मंजूर नसताना युध्दपातळीवर चालू असलेल्या बांधकामावर कारवाई का करत नाही, अशी विचारणा करुन त्या संदर्भातील आठ मुद्दयांची माहिती अपीलकर्ता श्री.वसंत आप्पासाहेब चौगुले यांनी जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी हा विषय कार्यकारी अभियंता, जवाहरलाल नेहरु योजना यांच्या अखत्यारीत येत असल्याच्या कारणावरुन पुढील योग्य त्या कारवाईसाठी त्यांच्याकडे वर्ग केला. परंतु अर्जाचे उत्तर मिळाले नाही व अपिलाची सुनावणी केली गेली नाही, म्हणून श्री.चौगुले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

एका खात्याकडून दुसऱ्या खात्याकडे अर्ज पाठविला त्यालाही दहा महिने होऊन गेले आहेत. दरम्यानच्या काळात बेकायदेशीर बांधकाम पूर्ण झालेले आहे, अशी तक्रार श्री.चौगुले यांनी केली.

माहिती देण्यास झालेला विलंब व अपिलाची सुनावणी याबाबतचा खुलासा जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पाच दिवसात करावा व श्री.चौगुले यांना पाच दिवसात

माहिती द्यावी. त्यानंतर शास्तीबाबत निर्णय घेतला जाईल, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाच्या आदेशानुसार श्री.चौगुले यांना माहिती देण्यात आली. परंतु 'कायद्याच्या पळवाटा पाहून उत्तरऽ दिली आहेत. नियमांची माहिती भाषांतर करुन सूचना मराठीत व पूर्णपणे दिली पाहिजे. बांधकामाचा नकाशा मंजूर झाला नाही, तरीही जागेवरील बदलाच्या स्थितीनुसार व नियमानुसार पाहून नकाशा मंजूर करता येतो, याचे सविस्तर उत्तर मराठीत द्यावे,' अशी मागणी श्री.चौगुले यांनी विविध स्मरणपत्राद्वारे( दि.५.९.२००८ ते दि.२१.८.२००९ ) राज्य माहिती आयोगाकडे सातत्याने केली व संबंधित अधिकाऱ्यांना शास्ती लावण्याची मागणी केली. महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी सुनावणीला हजर नसल्याचेही त्यांनी विविध पत्रांमध्ये नमूद केले आहे. मात्र संबंधित अधिकारी महानगरपालिकेचे प्रतिनिधी म्हणून आयुक्तांच्या मान्यतेने उपस्थित होते.

'पुणे महानगरपालिकेमध्ये जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहर पुनरुत्थान अभियान अंतर्गत शहरामध्ये रस्ता विकसनाची कामे करणेकरिता सप्टेंबर २००७ साली नव्याने प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, ओरीयन इमारत, (अतुर पार्क), पुणे येथे उघडण्यात आलेला आहे. तसेच क्षेत्रिय कार्यालय स्तरावर बांधकाम नियंत्रण कामाच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यात आलेले आहे. त्यामुळे या संक्रमण कालावधीमध्ये संबंधित अर्जदारास माहिती देण्यास विलंब झाला आहे. यामध्ये पुणे महानगरपालिका प्रशासनाचा माहिती न देण्याचा वा हेतुपुरस्सर विलंब करण्याचा हेतू नव्हता व नाही. यापुढे अर्जदारांना वेळेत माहिती उपलब्ध करुन देण्याची दक्षता घेण्यात येईल,' असा खुलासा विशेष कार्याधिकारी (तांत्रिक संचालक)प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (जनेराशपुअ), पुणे महानगरपालिका श्री.विनय देशपांडे यांनी दि.२९.८.२००८ च्या पत्रान्वये केला.

श्री.चौगुले यांना द्यावयाची माहिती संकलित करण्यासाठी 'जागेवरील प्रत्यक्ष परिस्थितीनुसार तपासणी केली, तेव्हा पुणे-नगर रस्त्याचे रुंदीकरणाचे काम सुरु होते. अर्थात नमूद

केलेले बांधकाम मंदिराचे असून रस्तारुंदीमध्ये अडथळा होत असल्याने सदर मंदिराचे पुनर्वसनाचे काम नव्याने स्थापन झालेल्या या विशेष कार्याधिकारी (तांत्रिक संचालक), जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी व ग्रामीण मॅनेजमेंट या स्वतंत्र विभागामकडून सुरु केले असल्याचे तपासणीमध्ये आढळले. मंदिराचे पुनर्वसनाचे काम जे.एन.यु.आर.एम. यांचेकडून होत असल्याने व या विभागाकडील रेकॉर्ड तपासणी केले असता सदरचे बांधकामास कोणतीही पूर्वपरवानगी घेतल्याचे आढळून आले नाही. बांधकाम संमतीची व त्या सबंधित माहिती इत्यादी सर्व कामे सन २००६ पर्यंत पुणे महानरगपालिका मुख्य कार्यालयाकडून होत असून क्षेत्रिय विभागवार कार्यालयाचे कामकाज जून २००७ पासून सुरु (कार्यालयाचे कामकाजांचे विकेंद्रीकरण झाल्याने) झाले होते. त्यास्तव क्षेत्रिय कार्यालयाचे विभागवार सर्व दप्तर हटविण्याचे काम सुरु झाल्याने, सदरचे कालावधीमध्ये कार्यालयीन कामकाज सुरळीतपणे सुरु होऊ शकली नाहीत,' असे उपायुक्त(ज), पुणे महानगरपालिका श्री.भानुदास माने यांनी आयोगाने विचारणा केल्यानंतर दि.९.९.२००९ च्या पत्रात केलेल्या खुलाशात नमूद केले आहे. वरील सर्व परिस्थितीमध्ये मुदतीत उत्तर दिलेले नव्हते, तसेच श्री.चौगुले यांनी अपील केले असते तर त्याचा विचार करता आला असता, असेही श्री.माने यांनी नमूद केले आहे.

वरील निवेदने लक्षात घेता माहिती देण्यास झालेला विलंब क्षमापित करण्यात येत असून शास्ती व अन्य कारवाईची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१४.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.राजेंद्र नामदेव साबळे
वर्षा निवास, साठेनगर, आटपाडी, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक (शिक्षण),
समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (अ.क्र.१४६) — उत्तरवादी
**जन माहिती अधिकारी** तथा उपसंचालक (प्रशासन),
समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

(२)**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,
पीएमटी कँटीन बिल्डिंग, स्वारगेट, पुणे (अ.क्र.२८१) — उत्तरवादी
**जन माहिती अधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कसबा बावडा, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४६ +२८१ / |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राजेंद्र नामदेव साबळे
वर्षा निवास, साठेनगर, आटपाडी, जि.सांगली

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक (शिक्षण),
समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.एल.एस.माळी
**जन माहिती अधिकारी** तथा उपसंचालक (प्रशासन),
समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.रा.शं.कलाल

| | | |
|---|---|---|
| (२)**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,<br>पीएमटी कँटीन बिल्डिंग, स्वारगेट, पुणे (अ.क्र.२८१) श्री.उमाकांत कांबळे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,<br>मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कसबा बावडा, कोल्हापूर डॉ.बाजीराव पाटील | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.९.२००६ (अ.क्र.२८१)<br>दि. १४.९.२००६ (अ.क्र.१४६) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.१०.२००६ (अ.क्र.२८१)<br>दि. १९.१०.२००६ (अ.क्र.१४६) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.१.२००७ (अ.क्र.२८१)<br>दि. १२.१२.२००६ (अ.क्र.१४६) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.११.२००७ (अ.क्र.२८१)<br>दि.१९.१०.२००७ (अ.क्र.१४६) |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>**अ.क्र.२८१+१४६**<br><br>शासकीय वसतीगृहामध्ये केल्या जाणाऱ्या रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या नेमणुकीबाबतच्या उपबंधांच्या सत्यप्रती. रोजंदारीची नेमणूक कोणकोणत्या पदांना व परिस्थितीमध्ये अनुज्ञेय असते आणि नेमणुकीचे, त्यास मंजुरी देण्याचे अधिकार कोणास असतात, इत्यादीबाबत नियम, परिपत्रके अशा स्वरुपातील उपबंधांच्या प्रती. | |

## विवेचन

मागासवर्गीय मुलामुलींच्या शासकीय वसतीगृहातील रोजंदारीवरील नेमणुकीबाबत अपीलकर्ता श्री.राजेंद्र नामदेव साबळे यांनी जन माहिती अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी व उपसंचालक (प्रशासन), समाजकल्याण संचालनालय, पुणे यांच्याकडे माहिती मागितली होती. अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये रोजंदारीसारखी तरतूद असतानाही, रोजंदारीवरील नियुक्तिस बंदी असल्याचे उत्तर दिले आहे. म्हणजे माहिती चुकीची आहे, असे प्रतिपादन

श्री.साबळे यांनी केले. अर्थसंकल्पामध्ये मंजुरी या संज्ञेखाली तरतूद आहे. सन १९७७ च्या शासन निर्णयाप्रमाणे स्वयंपाकी मदतनीस दहा दिवसांसाठी नेमण्यात येत असत. परंतु सन २००१ मध्ये त्यावर शासनाने बंधन घातले. संबंधित शासन निर्णयाच्या प्रतीसह सर्व माहिती श्री.साबळे यांना वेळोवेळी देण्यात आलेली आहे. ऑक्टोबर २००६ पासून या संदर्भात शासनाकडे पत्रव्यवहार चालू आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी डॉ.बाजीराव पाटील, श्री.राजेंद्र शंकर कलाल व अपिलीय प्राधिकारी श्री.उमाकांत कांबळे व श्री.एल.एस.माळी यांनी केले.

श्री.साबळे यांना माहिती देण्यात आली आहे. शासकीय वसतीगृहातील रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांच्या नियुक्तिविषयीचा श्री.साबळे यांचा मुख्य प्रश्न आहे. त्याबाबत समाजकल्याण संचालनालयाच्या स्तरावर व शासकीय स्तरावर कार्यवाही चालू असल्याचे श्री.माळी व श्री.कांबळे यांनी सांगितले.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. प्रशासकीय कार्यवाहीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१६.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. दिपक बाबुराव तेलंग
गरीबी हटाव झोपडपट्टी नं. २, संजयनगर,
विजापूर नाका, सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

अपिलीय प्राधिकारी,
जिल्हा विशेष समाजकल्याण अधिकारी कार्यालय,
उस्मानाबाद

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
रामदासजी आठवले केंद्रिय माध्यमिक निवासी आश्रम शाळा,
काटी, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४६५ /२००९/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१५.७.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२८.८.२००९ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** सन २००४ ते दि. १५.०७.२००९ या कालावधीत आश्रम शाळेत कार्यरत असणा-या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे हजेरी पत्रक, वेतन रजिस्टर, सेवाविषयक बाबी, जनरल रजिस्टर जावक रजिस्टर व प्रत्येक वर्षाचा वार्षिक तपासणी अहवाल. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. दिपक बाबुराव तेलंग यांना माहिती प्राप्त न झाल्याने, राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. सदर अपिलासोबत अपीलकर्त्याने आवश्यक मुद्रांक शुल्क (रू-२०/-) जोडलेले नाही. तसेच दारिद्रय

रेषेखाली असल्याबाबतचा कोणताही पुरावा जोडलेला नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करणे शक्य नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.३१.१०.२००९**

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सचिन भानुदास गोडांबे
धावडे आळी, गोडांबे वाडा, भोसरी, पुणे-३९ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक,
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
बालभारती, सेनापती बापट मार्ग, पुणे-४ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती व विधी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
बालभारती, सेनापती बापट मार्ग, पुणे-४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४७६+१६३८ /पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.१०.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सचिन भानुदास गोडांबे
धावडे आळी, गोडांबे वाडा, भोसरी, पुणे-३९

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती व विधी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
बालभारती, सेनापती बापट मार्ग, पुणे-४ तत्कालीन-श्री.श्रीरंग शंकरराव बोबडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.९.२००७ (अ.क्र.१४७६)<br>दि.१४.१२.२००७ (अ.क्र.१६३८) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.९.२००७ (अ.क्र.१४७६)<br>दि.२८.१२.२००७ (अ.क्र.१६३८) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.१०.२००७(अ.क्र.१४७६)<br>दि.२.१.२००८ (अ.क्र.१६३८) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.११.२००७(अ.क्र.१४७६)<br>दि.२.२.२००८ (अ.क्र.१६३८) |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

इयत्ता चौथीच्या 'शिवछत्रपती' या पुस्तक लेखनासाठी वापरलेल्या सर्व संदर्भ साधनांची यादी व मूळ हस्तलिखिताची प्रत अपीलकर्ता श्री.सचिन भानुदास गोडांबे यांनी जन माहिती अधिकारी तथा माहिती व विधी अधिकारी, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, सेनापती बापट मार्ग, पुणे यांच्याकडे दोन अर्जांद्वारे मागितली होती. दोन वेगवेगळ्या अर्जांना वेगवेगळी माहिती देऊन दिशाभूल केली. त्याबद्दल जन माहिती अधिकारी श्री.श्रीरंग शंकरराव बोबडे व अपिलीय प्राधिकारी डॉ.वसंत काळपांडे यांच्यावर कारवाई करावी. छत्रपती शिवरायांचा खोटा इतिहास पसरविल्याबद्दल संबंधितांवर कारवाई करुन हा खोटा इतिहास बदलण्याची कार्यवाही करण्याबाबत केलेल्या मागणीकडे दुर्लक्ष केल्याची दखल घ्यावी, अशी मागणी श्री.गोडांबे यांनी दोन अपिलांद्वारे राज्य माहिती आयोगाकडे केली आहे.

आपण दि.१.९.२००७ च्या अर्जान्वये माहिती मागितली. त्यावर 'शिवछत्रपती (इतिहास, नागरिकशास्त्र आणि प्रशासन) इयत्ता-४ थी या पाठ्यपुस्तकाची प्रथमावृत्ती सन १९७० मध्ये प्रकाशित झाली. महाराष्ट्र शासन निर्णयानुसार या पाठ्यपुस्तकातील 'शिवचरित्राचा' भाग गेल्या ३७ वर्षांपासून जसा आहे तसाच आहे. ३७ वर्षांपूर्वी या पाठ्यपुस्तकासाठी कोणते संदर्भ ग्रंथ वापरले याबाबतची माहिती मंडळाकडे उपलब्ध नाही. त्यामुळे आपण आपल्या दि.१.९.२००७ च्या

अर्जान्वये या कार्यालयाकडून मागविलेली माहिती आपणांस उपलब्ध करुन देता येत नाही, याबद्दल दिलगीर आहे,' असे उत्तर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा माहिती व विधी अधिकारी, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, सेनापती बापट मार्ग, पुणे श्री.श्रीरंग शंकरराव बोबडे यांनी दिले. त्याविरुध्द आपण केलेले अपील तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, सेनापती बापट मार्ग, पुणे डॉ.वसंत काळपांडे यांनी फेटाळले. त्यानंतर दि.१४.१२.२००७ रोजी याच माहितीची मागणी आपण वेगळ्या अर्जाद्वारे केली. त्यावर, 'आपण आपल्या अर्जात मागविलेली माहिती गोपनीय असल्याने, तसेच सदरहू माहिती उघड केल्याने सार्वजनिक हिताला बाधा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील माहिती प्रगट करण्याबाबत अपवार कलम ८(१)(क)(ङ)(छ)(ञ) तरतुदीअंतर्गत आपला अर्ज फेटाळण्यात येत आहे. त्यामुळे आपल्या अर्जात मागितलेली माहिती व कागदपत्रे आपणास उपलब्ध करुन देणे शक्य नाही,' असे उत्तर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा माहिती व विधी अधिकारी, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, सेनापती बापट मार्ग, पुणे श्री.श्रीरंग शंकरराव बोबडे यांनी दिले. त्यावर आपण अपील केले, परंतु तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा कार्यालय सचिव, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, सेनापती बापट मार्ग, पुणे श्री.चारुदत्त आनंदराव शिंदे यांनी समाधानकारक उत्तर दिले नाही. एका अर्जावर मंडळाकडे माहिती नसल्याचे उत्तर दिले जाते व दुसऱ्या अर्जावर ती माहिती गोपनीय असल्याचे उत्तर दिले जाते. हे दिशाभूल करणारे आहे. याचा अर्थ 'बालभारती'कडे माहिती उपलब्ध आहे, असा होतो, असे प्रतिपादन श्री.गोडांबे यांनी केले.

श्री.गोडांबे यांच्या दि.१.९.२००७ च्या अर्जाला दिलेल्या उत्तराप्रमाणे ३७ वर्षांपूर्वीची हस्तलिखिताची प्रत व संबंधित संदर्भांची माहिती मंडळाकडे नाही, ही वस्तुस्थिती आहे.

'शिवछत्रपती पुस्तकातून खोटा इतिहास गेली ३७ वर्षे शिकविल्याप्रकरणी सर्व संबंधित दोषींवरती गुन्हे दाखल करुन खटले भरण्यात यावेत,' या मागणीसह, मूळ अर्जात नसलेले असे कार्यवाहीविषयक चार मुद्दे प्रथम अपिलाच्या अर्जात त्यांनी मांडले होते. तसेच खरा इतिहास लिहिण्यासाठी मार्गदर्शन घेण्याविषयी काही नामवंतांची नावे सुचविली होती. मूळ अर्जापेक्षा काही वेगळे मुद्दे प्रथम अपिलात मांडले होते व मुख्यत: कोणती कारवाई करावी याबद्दलचे ते होते. श्री.गोडांबे यांनी दुसरा अर्ज केला तेव्हा या विषयाबाबत संवेदनशील परिस्थिती होती. ते लक्षात घेऊन माहिती गोपनीय असल्याचे उत्तर देण्यात आले. मात्र हे उत्तर योग्य नव्हते. तसेच श्री.गोडांबे यांनी केलेल्या सूचनांच्या संदर्भात अपिलीय प्राधिकारी तथा कार्यालय सचिव श्री.चारुदत्त आनंदराव शिंदे यांनी चर्चा करुन त्यांच्या सूचनांच्या अनुषंगाने उत्तर दिले. 'नियमानुसार उत्तर पाठविण्याची कार्यवाही वेळेत पूर्ण करण्यात आलेली आहे. आपल्या दिनांक २.१.२००८ च्या अपील अर्जासंदर्भात आपणासमवेत या कार्यालयात दिनांक १९.१.२००८ रोजी दुपारी १२.३० ते २.१५ या वेळात समक्ष चर्चा करण्यात आली होती. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५मधील माहिती प्रकट करण्याबाबत अपवाद कलम ८(१)(क) घ (ङ)(छ) आणि (ज) तरतुदीअंतर्गत महिती देण्यास असमर्थता दर्शविली आहे. तथापि शैक्षणिक वर्षे २००९-१० पासून इयत्ता ४ थीचा संपूर्ण अभ्यासक्रम बदलत आहे. त्यावेळी इयत्ता ४थी इतिहास पुस्तक लिखाणातील आपण उपस्थित केलेल्या बाबीवर चर्चा करण्यासाठी मंडळाच्या इतिहास समितीच्या सभेस आपण अथवा आपण सुचविलेले तज्ज्ञ यांना पाचारण करण्यात येईल,'असे त्यात म्हटले आहे. माहिती दडविण्याचा अथवा दिशाभूल करण्याचा कोणताही उद्देश नव्हता, असे प्रतिपादन श्री.बोबडे यांनी केले.

श्री.गोडांबे यांनी मूळ अर्जाव्यतिरिक्त मुद्दे प्रथम व द्वितीय अपिलात नमूद केले आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील विहित प्रक्रियेनुसार ते योग्य नाही. तसेच हे मुद्दे प्रामुख्याने कारवाईची मागणी करणारे असून तो प्रशासकीय कार्यवाहीचा भाग आहे. माहितीचा

अधिकार अधिनियम, २००५ अन्वये 'माहिती' च्या व्याख्येत त्याचा अंतर्भाव होत नाही. तथापि विषयाचे महत्त्व लक्षात घेता दोन भिन्न उत्तरांच्या संदर्भातील स्पष्टीकरणाचे पत्र श्री.गोडांबे यांना द्यावे, तसेच इयत्ता चौथीच्या इतिहास पुस्तकातील बदलाच्या संदर्भात शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती संदर्भित शासन परिपत्रकाच्या प्रतीसह श्री.गोडांबे यांना तीन दिवसांत द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाच्या आदेशानुसार श्री.एस.एन.पवार, संचालक, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे यांनी दि.२३.१०.२००८ रोजी श्री.गोडांबे यांना पत्र पाठवून त्याची प्रत आयोगास सादर केली. 'इयत्ता ४ थीच्या 'शिवछत्रपती'पुस्तकातील ज्या ४ बाबींविषयी संदर्भ विचारण्यात आलेले होते, ते सदरचे पुस्तक १९७० साली प्रकाशित केलेले असून गेल्या ३८ वर्षांत त्यामध्ये कोणताही बदल केलेला नाही. अशा प्रकारचे बदल तूर्त करु नयेत याबाबत शासनाची पत्र क्रमांक (१)टिबीके २००५(८/२००५)साशि-१, दिनांक ८ फेब्रुवारी २००५, (२)टिबीके २००६(५/२००६) साशि-१, दिनांक ८ फेब्रुवारी २००६, (३)टिबीके २००६(५/२००६) साशि-१, दिनाक २ नोव्हेंबर २००६, (४)टिबीके २००७(२१६/०७) साशि-१, दिनांक ८ फेब्रुवारी २००८, अशी पत्रे आहेत. त्या पत्रांच्या छायाप्रती साबत जोडलेल्या आहेत. (परि.अ-१, अ-२, अ-३, अ-४). ३७ वर्षांपूर्वीची पुस्तकाची मूळ संहिता कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याने आपणास याबाबत विचारलेले संदर्भ देता आलेले नाहीत. 'शिवछत्रपती'या पुस्तकाबाबत आपण विचारलेली माहिती , ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील माहिती प्रकट करण्याबाबत अपवाद 'कलम ८ मधील १(क)(ड) आणि (छ) (ञ) मधील' तरतुदीअंतर्गत आपला अर्ज फेटाळून आपणास माहिती व कागदपत्रे उपलब्ध करुन देता येणे शक्य नाही, असे जे कळवले आहे ते तत्कालीन परिस्थितीत सदरचा विषय हा संवेदनशील असल्यामुळे त्यांनी सदर नियमाचा आधार घेतलेला आहे. ही तत्कालीन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची चूक झालेली आहे, त्याबद्दल कार्यालय दिलगीर आहे. पुस्तक ३० वर्षांपूर्वी प्रकाशित झाले असल्याने व त्याकाळचे संदर्भ उपलब्ध नसल्याने माहिती देता

आलेली नाही. माहिती न देणे अथवा माहिती दडवणे असा यामागील या कार्यालयाचा हेतू नव्हता ही बाब कृपया, आपण समजून घ्यावी, ही विनंती. सद्यस्थितीत आपण व आपणासारख्या अन्य काही व्यक्तींनी इयत्ता ४ थीच्या शिवछत्रपती पुस्तकातील काही संदर्भांबाबत जे आक्षेप नोंदवलेले आहेत अथवा सूचना केलेल्या आहेत, त्याबाबत विचार करण्यासाठी शासनाने त्यांच्याकडील पत्र क्रमांक टिबीके/२००७(२१६/०७) साशि-१, दिनांक २२/२३ सप्टेंबर २००८, अन्वये तज्ज्ञांची समिती गठित केलेली असून सदर समितीचे कामकाज सध्या चालू आहे व शैक्षणिक वर्ष २००९ पासून या अशा प्रकारच्या सूचनांची दखल घेऊन आवश्यक त्या दुरुस्त्या सदर पुस्तकात करणे प्रस्तावित आहे,' असे या पत्रात श्री.पवार यांनी नमूद केले आहे.

उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ७ .१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.रशद एम. शेख
१७१५, आर.एस.केदारी रोड,
कँप, पुणे ४११ ००१ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद, पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
लॉयला हायस्कूल व ज्यूनियर कॉलेज, पाषाण, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४७७/२००९/ पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.७.९.२००९, दि.२८.४.२००९, दि.२५.२.२००९ व दि.९.३.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१३.८.२००९, दि.२६.३.२००९ व दि.४.३.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२.६.२००९, दि.१५.४.२००९, दि.२१.४.२००९ व दि.२८.४.२००९ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** लॉयला हायस्कूलच्या व्यवस्थापनासंदर्भातील माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.रशद एम. शेख यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलासोबतच्या कागदपत्रांच्या तपासणीअंती अपीलकर्ता श्री.शेख यांनी विविध ६ माहिती - मागणी अर्जांच्या संदर्भात आयोगाकडे एकत्रित अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे
दिनांक : २३ / १०/२००९

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**